अवैध दारू वाहन पकडून १,६०,४८० रुपयाचा मुद्देमाल जप्त
>> पान 2

पोलिसांचा धाक समाजात राहिलेला नाही : जयंत पाटील यांचा आरोप
>> पान 3

आयुर्वेद, आधुनिक वैदिक पद्धती यांच्यातील दरी कमी होणार
>> पान 4


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034


**सुविचार**

व्यक्ति सर्वदा अन्यायाच्या साथी नसावा, पण न्यायाच्या साथी असावा



प्रभू देवा पहिल्यांदाच स्वत:च्या मुलाबरोबर थिरकला; 'पट्टी रॅप'वर लेकाकडून बापाला चॅलेंज

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 197 ■ गुरूवार, दि. 27 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार

## स्वारगेट स्थानकात थांबलेली असतानाची घटना

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी : पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात एका २६ वर्षीय तरुणीवर बसमधे बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. २६ वर्षीय तरुणीवर पहाटे स्वारगेट एसटी स्टँडमध्ये उभ्या असलेल्या बसमध्ये बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पोलिसांची पथके आरोपीच्या मागावर आहेत. पहाटे ५.३० वाजता पुण्यातील एस टी स्टँड वर धक्कादायक घटना घडली आहे. २६ वर्षीय तरुणी काल पहाटे पुण्याहून फलटणला निघाली होती. त्या दरम्यान बस स्थानकात ही घटना घडली. गुन्हा घडल्यावर हा नराधम आरोपी दत्तात्रय गाडे हा फरार झाला असून त्याचा शोध घेतला जातोय.**

या प्रकरणातील नराधम आरोपी दत्तात्रय गाडे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर या आधी गंभीर गुन्हे नोंद आहेत. चेन स्नॅचींग सारखे गुन्हे त्याच्यावरती आहेत. पोलिसांकडून या नराधम आरोपी दत्तात्रय गाडे याचा शोध घेतला जात आहे. मात्र, या घटनेने पुन्हा एकदा पुणे शहरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. स्वारगेट परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर रहदारी असते, अशातही आरोपीने या तरूणीवरती एसटी बस स्थानकामध्ये असं कृत्य केल्यानं महिला सुरक्षित आहेत का? असा सवाल उपस्थित झाला आहे.

ही घटना घडल्यानंतर पुण्यात त्या तरूणीची कोणतीही मदत केली नसल्याची माहिती आहे. जेव्हा तरूणी दुसऱ्या बसने घरी पोहोचली तेव्हा तिने हि घटना घरी सांगितली. त्यानंतर पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. >> पान २



## शेकडो कंडोम पडलेत, इथे रोज बलात्कार होतात, आक्रमक वसंत मोरेंनी स्वारगेटमधील सुरक्षा केबिन फोडली

पुणे: पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात २६ वर्षीय तरुणीवर झालेल्या अत्याचारानंतर, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आक्रमक पवित्रा घेतला. माजी नगरसेवक वसंत मोरे यांच्या नेतृत्त्वात शिवसैनिकांनी आज स्वारगेट बसस्थानकात घुसून, सुरक्षा रक्षकांची केबिन फोडली. सुरक्षा रक्षकांच्या केबिनबाहेर, स्वारगेट बसस्थानक परिसरात शेकडो कंडोम पडलेत, म्हणजे इथे दररोज बलात्कार होतात, मग इथे सुरक्षा रक्षकांची केबिन कशाला आहे? असे सवाल करत, वसंत मोरे यांनी सुरक्षा रक्षकांची केबिन फोडली. >> पान २

## सर्व २३ सुरक्षा रक्षकांचं निलंबन!

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** स्वारगेट बसस्थानक परिसरात मंगळवारी पहाटे एका महिलेवर अज्ञात व्यक्तीकडून अत्याचार करण्यात आला. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी संबंधित बसस्थानकावरील कार्यरत असलेले स्थानकप्रमुख (सहाय्यक वाहतूक अधिक्षक) व आगार व्यवस्थापक यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्फत विभागीय चौकशी करून दोष आढळल्यास त्यांना तात्काळ निलंबित करावे. असे निर्देश उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी) श्री. विवेक भीमनराव यांना दिले आहेत. तसेच एकूणच महिला प्रवाशांच्या सुरक्षे संदर्भात आढावा घेण्यासाठी उद्या एसटीच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक बोलाविण्याचे निर्देश देखील मंत्री सरनाईक यांनी दिले आहेत.



मंगळवारी पहाटे स्वारगेट बसस्थानकावर उभ्या असलेल्या शिवशाही एसटी बस मध्ये एका महिलेवर अज्ञात व्यक्तीने अत्याचार केल्याची घटना घडली. यासंदर्भात संबंधित महिलेने स्वारगेट पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे. सदर घटनेची परिवहन मंत्री श्री . प्रताप सरनाईक यांनी गंभीर दखल घेतली असून संबंधित बसस्थानकावरील त्या वेळी कर्तव्य असलेल्या स्थानक प्रमुख तसेच त्या आगाराचे प्रमुख यांची या प्रकरणी प्रवाशांच्या सुरक्षा संदर्भात हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल विभागनिहाय चौकशी करावी, त्या चौकशीमध्ये ते दोष आढळल्यास त्यांना तात्काळ निलंबित करावे असे निर्देश दिले आहेत.
>> पान २

# मार्च महिन्यात 'इतके' दिवस असणार बँकांना टाळे!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** फेब्रुवारी महिना अखेरीस अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असून आगामी मार्च महिन्याला सुरुवात होणार आहे. दरम्यान भारतीय रिझर्व्ह बँक प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीला बँक सुट्टीची यादी जाहीर करते. त्याचप्रमाणे मार्च महिन्यातील बँक सुट्ट्यांची यादी देखील जारी झाली आहे. यामध्ये शनिवार आणि रविवार वगळता इतर काही दिवस बँका बंद असणार आहेत. त्यामुळे नागरिकांना बँक सुट्ट्यांची यादी पाहूनच बँकेचे कामे पूर्ण करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) जारी केलेल्या बँक सुट्ट्यांनुसार दुसरा आणि चौथा शनिवार आणि रविवार वगळता आठ दिवसांपर्यंत बंद राहणार आहेत. तर काही राज्यात एकूण १३ दिवस बँका बंद राहणार आहेत. जाणून घ्या याबाबतची संपूर्ण यादी.

२ मार्च – २ मार्च रोजी रविवार असल्याने बँका बंद असणार आहे.




७ मार्च – यादिवशी चपचार कुट हा मिझोरमचा सर्वात मोठा आणि लोकप्रिय सण आहे, जो वसंत ऋतूच्या आगमनासाठी साजरा केला जातो. या दिवशी राज्यात सार्वजनिक सुट्टी असल्याने मिझोरममध्ये बँका बंद राहतील.

८ मार्च – यावेळी दुसरा शनिवार असल्याने देशभरातली सर्व बँका बंद असणार आहे.

९ मार्च – यादिवशी रविवार असल्याने सर्व बँकांना सुट्टी असणार आहे.

१३ मार्च – यादिवशी होलिका दहन किंवा छोटी होळी हा होळीच्या एक दिवस आधी साजरा केला जातो. तर दुसरीकडे, अट्टुकल पोंगळा हा >> पान २

## संतोष देशमुख हत्याप्रकरणात सरकारी वकील म्हणून
# उज्ज्वल निकम यांची नियुक्ती

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात महाराष्ट्र सरकारतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून, तर ॲड. बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी उज्वल निकम यांच्या नियुक्तीच्या आदेशाची प्रत सोशल मीडियावर शेअर करत याबाबत माहिती दिली. संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्यादृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट मानली जात आहे. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांकडून आणि मस्साजोगच्या गावकऱ्यांनी सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांच्या नियुक्तीची मागणी लावून धरण्यात आली



होती. या मागणीला अखेर यश आले आहे.

उज्वल निकम हे महाराष्ट्रातील अत्यंत नावाजलेले वकील आहेत. त्यांनी मुंबई बॉम्बस्फोट खटल्यासारख्या महत्त्वाचे खटले लढवले आहेत. मुंबईवरील २६/११ हल्ल्यातील दहशतवादी अजमल कसाब याला फासावर लटकवण्यात उज्वल निकम यांचे महत्त्वाचे योगदान होते. त्यामुळे उज्वल निकम हे हायप्रोफाईल वकील म्हणून ओळखले जातात. संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या खटल्यात त्यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाल्याने वाल्मिक कराड आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

केज तालुक्यातील आवादा कंपनीकडून मागण्यात आलेल्या खंडणी प्रकरणातून संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. यामध्ये विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि त्यांच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली होती. तर या प्रकरणाचा सूत्रधार असल्याचा वाल्मिक कराड याने पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले होते. या सगळ्यांवर मकोका अंतर्गत >> पान २

# महाराष्ट्रात नवीन ७३ शाळा सुरु होणार

## फक्त आठच मराठी शाळा, ६५ इंग्रजी शाळांना मान्यता

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात नवीन ७३ शाळा सुरू होणार आहेत. ७३ पैकी ६५ शाळा इंग्रजी माध्यमाच्या तर आठ शाळा या मराठी माध्यमाच्या असणार आहेत. महाराष्ट्र स्वयं अर्थसहायित शाळा अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा व अस्तित्वात असलेल्या शाळांचे दर्जा वाढ देण्यासाठी आलेल्या प्रस्तावाची छाननी शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात आली आहे.




नवीन शाळांच्या मंजुरीसाठी आणि असेच असलेल्या शाळांच्या दर्जा वाढीसाठी एकूण २४१ पत्र प्राधिकरणाचा प्राप्त झाले होते. त्यानुसार ७३ नवीन शाळा येत्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्रात सुरू होतील... यामध्ये मुंबईत सर्वाधिक २८ नव्या शाळा सुरू होतील. तर नाशिक आणि पुण्यामध्ये प्रत्येकी ९ शाळा सुरू होणार आहेत.

७३ नव्या शाळांमधील ६० शाळा या राज्य मंडळाचे असतील ११ शाळा सीबीएसईच्या तर एक शाळा आयसीएसई आणि एक शाळा केंब्रिज बोर्डाची असेल. ७३ नव्या शाळा व्यतिरिक्त ५४ अस्तित्वात असलेल्या शाळांना दर जवळ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. ज्या शाळेमध्ये प्राथमिक आणि माध्यमिकसोबत उच्च माध्यमिक वर्ग सुद्धा सुरू केले जातील.

### कुठे किती नव्या शाळा सुरू होणार?

मुंबई- २८, नाशिक- ९, पुणे- ९, अमरावती- ८, छत्रपती संभाजी नगर- ७, कोल्हापूर- ६, लातूर- ५. राज्य शासनाकडून शालेय विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जाते. या मध्यान्ह भोजनात पोषक तत्त्वांचा समावेश असावा, असा नियम असून गेल्या काही दिवसांपासून या पोषण आहारातून अंडी गायब झाली आहेत. या प्रकरणी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारला अंडी पाठवून निषेध व्यक्त केला होता. यानंतर हे प्रकरण चांगलेच चर्चेत आले आहे. आता मध्यान्ह भोजनात पुन्हा अंडी सुरु करण्याबाबत राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मोठे संकेत दिले आहे.

# शरद पवार गटाला भगदाड पडणार?

### विधानसभा लढवलेले नेते अजितदादांच्या राष्ट्रवादीत जाण्याच्या तयारीत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या राजकारणात लोकसभा, विधानसभा निवडणुका झाल्यानंतरही घडामोडींना वेग आला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवलेले धाराशिव जिल्ह्यातील भूम परंडा विधानसभेचे उमेदवार राहुल मोटे, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा विधानसभेतील अपक्ष उमेदवार राहुल जगताप तसेच परभणी मधील सेलू जिंतूर येथील विजय भांबळे हे शरद पवारांची साथ सोडत अजित पवारांच्या पक्षात प्रवेश करण्याच्या हालचाली जोरदार सुरू असल्याची सूत्रांची माहिती आहे. आता पुन्हा एकदा अजित पवारांची राष्ट्रवादी



काँग्रेस शरद पवारांना मोठा धक्का देणार असल्याच्या चर्चा आहेत.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीत मात्र, या नेत्यांच्या प्रवेशावरून विरोध सुरू झाला आहे. तर दुसरीकडे महायुती मित्र पक्षांच्या विरोधात निवडणूक लढवलेले विरोधक उमेदवारांना थेट अजित पवार पक्षात घेत ताकद देत असल्याने देखील मोठ्या प्रमाणात महायुतीत नाराजीचा सूर उमटण्याची शक्यता आहे. अजित पवार स्वतःचा पक्ष वाढवण्यासाठी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस मधील अनेकांना परत पक्षात समावून घेऊ पाहत आहेत. यामुळे परत एकदा शरद पवार विरुद्ध अजित पवार अंतर्गत राजकीय स्पर्धा वाढू लागली आहे.

## माझी मराठीची बोलू कौतुके... परी अमृतातही पैजा जिंके.....

मराठी ही आपली मातृभाषा आहे तसेच ती महाराष्ट्राची राज्यभाषाही आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या शैलीदार लेखणीतून ज्यांनी मराठी भाषेला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले ते जेष्ठ साहित्यिक ज्ञानपीठ विजेते वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. कुसुमाग्रजांना १९८७ साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. हा मराठी भाषेला मिळालेला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार होता. त्यामुळे त्यांचा जन्मदिवसच मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यास महाराष्ट्र शासनाने सुरवात केली. भारतातील २२ प्रमुख भाषांपैकी मराठी ही एक प्रमुख भाषा आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्याची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही पंधरावी तर देशातील तिसरी भाषा आहे. २००१ च्या लोकसंख्येनुसार मराठी बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या दहा कोटींच्या पुढे आहे. मराठी भाषा ९ व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतपासून झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. मराठी भाषेला गौरवपूर्ण इतिहास आहे. देशातीलच नव्हे तर जगातील प्रमुख भाषा म्हणून मराठीकडे पाहिले जाते. ज्ञानेश्र्वरांपासून कुसुमाग्रजांपर्यंत अनेकांनी मराठी भाषेला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. माझी मराठीची बोलू कौतुके... परी अमृतातही पैजा जिंके .... ऐसी अक्षरे रसिके....मेळवीन अशा शब्दात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी मराठीचा गौरव केला आहे. लाभले आम्हास भाग्य...बोलतो मराठी... अशा शब्दात कविश्रेष्ठ सुरेश भटांनी मराठीचा गौरव केला आहे. एक हजार वर्ष जुनी, पाच हजार बोली भाषेपासून तयार झालेली, अमृतातही पैज जिंकणाऱ्या या माय मराठी भाषेच्या जपणुकीसाठी आपण काय करतो याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. आज हिंदी आणि इंग्रजी भाषांनी मराठी भाषेवर आक्रमण केले आहे. इंग्रजी व हिंदी भाषेच्या आक्रमणाने महाराष्ट्रातूनच मराठी भाषा हद्दपार होती की काय अशी शंका येऊ लागली आहे. अर्थात याला सर्वस्वी मराठी माणसेच जबाबदार आहे. मराठी माणसांच्या मनातच मराठीला गौण स्थान आहे आणि इंग्रजी भाषेला प्रथम स्थान आहे. इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. इंग्रजीला ज्ञानभाषा म्हटले जाते म्हणून मराठीची उपेक्षा केली जात आहे. विशेषतः उच्चभ्रू मराठी कुटुंबात मराठीत बोलणे अप्रतिष्ठित समजले जाते तर इंग्रजी भाषेत बोलणे प्रतिष्ठेचे समजले जाते. मराठी ही मातृभाषा असूनही इंग्रजीतून बोलण्याचा अट्टहास धरला जातो. मराठी माणसे एकमेकांशी बोलताना मराठीत बोलायला कचरतात. मराठीपेक्षा इंग्रजी आणि हिंदीतून बोलणे प्रतिष्ठेचे समजतात. मराठी माणसेच आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या शाळेत दाखल करण्याऐवजी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत भरमसाठ फी भरुन दाखल करीत आहे. इंग्रजी भाषेचे अवास्तव स्तोम माजवल्याने मराठीमाध्यमांच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. मराठी साहित्य संमेलनाकडे मराठी माणसेच पाठ फिरवू लागल्याने मराठी पुस्तकांच्या विक्रीत घट होऊ लागली आहे. ग्रंथालयातील मराठी पुस्तके वर्षानुवर्षे जागेवरूनही हलतही नाही. महाराष्ट्रातच मराठी भाषेची उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे काम मराठी, साहित्यिक व सरकारचे आहे असेच मराठी माणसाला वाटते. मराठी साहित्यिकांना, लेखकांना मराठी भाषेविषयी जन्मजात प्रेम आहेच. अभिमान आहे. मराठी भाषा गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि आकर्षक होईल यासाठी ते आपल्या परीने प्रयत्न करीतही आहे. महाराष्ट्र सरकारही मराठी भाषा जिवंत रहावी यासाठी प्रयत्न करीत आहे. पण महाराष्ट्र सरकारचे हे प्रयत्न तोकडे आहेत असेच म्हणावे लागेल. मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचे अतिक्रमण वाढत असताना ते रोखण्यासाठी सरकार ठोस प्रयत्न करीत असल्याचे दिसत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मागणी तसा पुरवठा या तत्वाने सरकार भराभर परवानगी देत आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सढळ हाताने परवानगी देणारे सरकार नवीन मराठी शाळांना परवानगी देत नाही तसेच आहे त्या शाळांना अनुदान देताना हात आखडता घेते. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर अनिवार्य असताना तिथेही मराठीची गळचेपी होते. अनेक सरकारी कार्यालयात आज देखील मराठीचा वापर नावापुरताच केला जातो. केंद्र सरकारच्या कार्यलयात तर मराठीचा वापर होतच नाही. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर व्हावा असा आदेश असताना त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. मराठी भाषा जगवण्यासाठी, वाचवण्यासाठी राज्य सरकारने खंबीर धोरण आखायला हवे. केवळ परिपत्रक काढून उपयोग नाही तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होते का याचाही शोध सरकारने घ्यावा. राज्य सरकारच्या व्यवहारात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी करणे, सरकारच्या दैनंदिन कामकाजात मराठीचा जास्तीतजास्त वापर करणे, मराठी शाळांना जी उतरती कळा लागली आहे त्यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन मराठी भाषेला उर्जितावस्था मिळवून देण्याचा प्रयत्न राज्य सरकारने करावा. मराठी ही अभिजात भाषा आहे. . अभिजात भाषेसाठी लागणारे सर्व निकष मराठी भाषा पूर्ण करत असूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी झगडावे लागले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारने केंद्र सरकारकडे पाठ पुरवठा केला. सर्व राजकीय पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी पक्षभेद विसरुन मराठीसाठी एकत्र येऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा प्रयत्न केले साहित्यिक, लेखक यांनीही यासाठी सामूहिक प्रयत्न केलेत. या सर्वाचा परिपाक होऊन अखेर यावर्षी मराठी भाषेवर अभिजात भाषेची मोहोर उमटली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर महाराष्ट्रात उत्साहाचे भरते आले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर १४ कोटी मराठी माणसांची मान अभिमानाने उंचावली. मराठी माणसांनी गेली कित्येक वर्ष पाहिलेले स्वप्न अखेर साकार झाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठी माणसांची जबाबदारी आणखी वाढली आहे. मराठी भाषा टिकवण्यासाठी, वाचवण्यासाठी आता सर्वांना सामूहिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. मराठी भाषा टिकवण्यासाठी, वाचवण्यासाठी सरकारी तसेच सामाजिक पातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. मराठी भाषेला सुगीचे दिवस आणण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. सर्वसामान्य मराठी माणसांपासून सरकारपर्यंत सर्वांनीच मराठीच्या उत्कर्षासाठी आत्मचिंतन करायला हवे.

मराठी भाषा दिनाच्या समस्त मराठी जनांना हार्दिक शुभेच्छा!!!

# अवैध दारू वाहन पकडून १,६०,४८० रुपयाचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड :** अवैध दारूची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कार्यवाही करून एकुण १,६०,४८० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असून त्याच्यावर महाराष्ट्र राज्य दारू प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. २४ फेब्रुवारी रोजी गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पोलीस स्टेशन उमरखेड हद्दीत चातारी बिट परिसरामध्ये मध्यरात्री एक ईसम त्याचे चारचाकी वाहन टाटा सुमोने अवैधदारु वाहतुक करीत आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन सपोनी सारीका नि. राऊत, यांनी तात्काळ याबाबत वरिष्ठांना अवगत करुन ग्राम लोहरा येथे सापळा रचून टाटा सुमो वाहनास थांबवुन चालक नामे वैभव मुंजाजी हिंगडे ( २०) वर्ष रा. चातारी ता. उमरखेड हा चालवित असलेल्या वाहणाची पाहीणी केली असता त्यामध्ये देशी दारु १८० मिलीचे १८ बॉक्स प्रत्येक बॉक्समध्ये ४८ बॉटल अशा एकूण ८६४ बॉटल किंमत प्रत्येकी ७० रुपये प्रमाणे एकुण ६०,४८० रुपयाची व चारचाकी टाटा सुमो वाहन अस्पष्ट दिसत असलेला वाहन क. MH-35-M-306 जुने वापरते किंमत अं.१,००,००० रुपये असा एकुण १,६०,४८० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई यवतमाळ जिल्हा पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधिक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग उमरखेड हनुमंत गायकवाड, पोलीस निरीक्षक पो. स्टे. उमरखेड शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी सारीका नि. राऊत, पोकॉ गिरजप्पा मुसळे ब.नं. १६८१, चालक पोका/आकाश ब.नं.९६४ पोलीस स्टेशन उमरखेड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली असून पुढील तपास सपोनि सारीका राउत हे करीत आहेत.

उमरखेड पोलीस स्टेशनची कार्यवाही



# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले आंगणेवाडीतील आई भराडी देवीचे दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मालवण मधील मसुरे गावातील आंगणेवाडीतील आई भराडी देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासोबत स्थानिक आमदार निलेश राणे, आमदार रवींद्र फाटक, आमदार किरण सामंत तसेच शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी आई भराडी चरणी प्रार्थना केली. २२ तारीखेला केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा दौरा असल्यामुळे यात्रेला येता आलं नाही. आई भराडीचे दर्शन होणारच होतं ते आज झालं. महाशिवरात्री निमित्ताने कुणकेश्वराचे दर्शन झालं आणि त्यानंतर आई भराडीचं देखील दर्शन झालं.

आंगणेवाडी हे संपूर्ण महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असल्यामुळे राज्यभरातील भाविक आई भराडीदेवी चरणी नतमस्तक होतात. गेली दहा वर्ष कुडाळ मालवण मतदारसंघात खऱ्या शिवसेनेचा आमदार नव्हता, आता तो निलेश राणेंच्या स्वरूपात आमदार आहे. त्यामुळे त्यांना इथले स्थानिक प्रश्न माहिती असून, आंगणेवाडीतील पाण्याचा आणि नेटवर्कचा प्रश्र्न आम्ही सोडवू. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभ मेळाव्यात आलेल्या करोडो लोकांची व्यवस्था केली. तशी आंगणेवाडी मध्ये येणाऱ्या भाविकांची व्यवस्था केली जाते.



लाडक्या बहिणीने, लाडक्या भावाने, लाडक्या शेतकऱ्यांनी आणि आई भराडीने भरभरून आशीर्वाद दिल्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा महायुतीचे सरकार आलं. आई भराडी देवीच्या आशीर्वादामुळे यश महाराष्ट्रात महायुतीला मिळालं. आतापर्यंतच्या महाराष्ट्राच्या इतिहासात महायुतीचे २३२ आमदार केव्हाच निवडून आले नव्हते. त्यामुळे आता आमची जबाबदारी आणखी वाढली आहे.

कोकणात देखील आम्ही सागरी महामार्ग करतोय. पुणे मुंबई किंवा नागपूर मुंबई एक्सप्रेस हायवे जसा केला तसा मुंबई सिंधुदुर्ग एक्सप्रेस हायवे देखील करणार. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल उद्योग व्यवसाय येतील. इथल्या स्थानिकांना मुंबईसारख्या शहरात नोकरीला जाऊ लागू नये यासाठी इथेच रोजगार व्यवस्था उपलब्ध करणार. त्यामुळे कोकणातील ब्लॅक लॉक येणारे काळात भरून काढणार. कोकणात पावसाळ्यात पडणारा मुसळधार पाऊस त्याचं पाणी समुद्राला जात, ते अडवून छोटी छोटी धरण बांधण्याचं प्रस्ताव सरकारकडे आहे. त्याचाही काम युद्धपातीवर सुरू आहे. महायुतीला कोकणाने सर्वत्र भरभरून यश दिले. असे मत यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

# प्रभू देवा पहिल्यांदाच स्वत:च्या मुलाबरोबर थिरकला; 'पट्टी रॅप'वर लेकाकडून बापाला चॅलेंज

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकप्रिय कोरियोग्रोफर, अभिनेता आणि दिग्दर्शक प्रभु देवाचा मुलगा ऋषी राघवेन्द्रचा डान्स पहिल्यांदाच सगळ्यासमोर आला. या व्हिडीओमध्ये ऋषी राघवेन्द्र हा हुबेहुब हा प्रभू देवासारखा डान्स करताना दिसत आहे. त्यामुळे त्याची सगळीकडे चर्चा सुरु असून त्याची स्तुती करत आहेत. प्रभू देवानं त्याच्या मुलाचा आणि त्याचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. हा व्हिडीओ शेअर करत त्यानं त्याच्या मुलाचं कौतूक केलं आहे. तर प्रभू देवानं शेअर केलेला हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

प्रभु देवानं त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून हा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये सुरुवातीला ऋषी राधवेन्द्र हा एका कार्यक्रमात डान्स करताना दिसत आहे. त्यानंतर प्रभू देवा हा त्याला जॉइन करतो आता दोघं बाप-बेटा हे डान्स करताना दिसतात. दरम्यान, हा व्हिडीओ शेअर करत प्रभू देवानं कॅप्शन दिलं की 'मला माझा मुलगा ऋषी राघवेन्द्रची तुमच्याशी ओळख करुन देताना मला गर्व होत आहे. कारण आम्ही पहिल्यांदा स्पॉटलाइट शेअर करत आहोत. हे डान्स पेक्षा खूप जास्त आहे. हा एक वारसा, एक आवड आणि एक प्रवास आहे जो नुकताच सुरू झाला आहे.' प्रभू देवानं मंगळवारी त्याच्या अकाऊंटवरून हा व्हिडीओ शेअर केला आहे. त्याच्या इन्टाग्राम अकाऊंटवरून शेअर केलेल्या या व्हिडीओत ते दोघे 'पट्टी रॅप' या गाण्यावर एकत्र परफॉर्म करताना दिसत आहे. या व्हिडीओमध्ये प्रभू देवा आणि त्याच्या मुलानं जबरदस्त डान्स करत असल्याचं दिसत आहे. खरंतर अनेकांना ऋषी राधवेन्द्रला डान्स करताना पाहून प्रभू देवाचीच आठवण आल्याचं म्हटलं आहे. या व्हिडीओवर नेटकरी विविध कमेंट करत आहेत. एक नेटकरी म्हणाला, 'जसा बाप आहे तसाच मुलगा आहे.' दुसरा नेटकरी म्हणाला, 'प्रभूदेवा कायम विनम्र आणि जमिनीशी जोडलेल्या लोकांपैकी एक आहे. तो स्टेजवर देखील त्याच्या मुलाला सगळ्यांचे आभार मानन्यास सांगत असल्याचं दिसत आहे. आम्ही त्यानं आजवर केलेल्या सगळ्या परफॉर्मेससाठी खूप आभारी आहे. खूप चांगलं परफॉर्म केलं आहे.'

पान १ वरून...

## शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय

घटनेनंतर आरोपी फरार झाला आहे. दत्तात्रय रामदास गाडे असं आरोपीचं नाव आहे. आरोपी अद्याप फरार आहे. गाडे हा मूळचा शिरूरचा आहे. त्याच्यावर शिक्रापूर आणि शिरुर पोलीस ठाण्यात गाडेवर गुन्ह्याची नोंद आहे. स्वारगेट बसस्थानक शहरातील सुरक्षित बसस्थानक समजलं जातं. २४ तास येथून बसेस जात असतात. बसस्थानकात पीडित तरुणीला चुकीची माहिती देऊन डेपोत थांबलेल्या शिवशाही बसमध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला. स्वारगेट बसस्थानकात ही घटना पहाटे साडे पाचच्या सुमारास घडली आहे. हा आरोपी रेकॉर्डवरील असला तरी स्वारगेटला इतक्या गाड्या असताना ही घटना कुणालाच कशी कळली नाही हा प्रश्र्न आहे. यामुळं स्वारगेट बसस्थानाकातील सुरक्षेचा प्रश्र्न ऐरणीवर आला आहे. आरोपीला शोधण्यासाठी पथकं रवाना झाली आहेत, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## शेकडो कंडोम पडलेत

आजच्या या घटनेला जर कुणी कारणीभूत असेल तर ते सुरक्षारक्षक आहेत. या ठिकाणी २० सुरक्षारक्षक असल्याचं सांगितलं जातंय. त्यामुळे या घटनेमध्ये सुरक्षा रक्षक सामील आहेत असा आरोप वसंत मोरे यांनी केला.

**या ठिकाणी सुरक्षा रक्षकांच्या संमतीने रोज बलात्कार**

वसंत मोरे म्हणाले की, या ठिकाणी सुरक्षा रक्षक करतात काय? बंद असलेल्या शिवशाही एसटीमध्ये शेकडो कंडोम्स दिसतात. त्या ठिकाणी महिलांच्या साड्या, अंतर्वस्त्र, दारुच्या बाटल्या, बेडशीट सापडले आहेत. त्यामुळे सुरक्षा रक्षकांच्या संमतीने रोज हे प्रकार घडत आहेत. सुरक्षा रक्षकच या प्रकारामध्ये सामील आहेत. या बंद बस आहेत त्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांच्या कार्यालयासमोरूनच जावं लागतं. तरीही अशा घटना कशा घडतात?

**स्वारगेट आगारप्रमुख, परिवहन मंत्री काय करतात?**

सुरक्षा रक्षकांची एवढी संख्या असताना, चहूबाजूने बंदिस्त असताना या घटना कशा घडतात? असा प्रश्र्न वसंत मोरे यांनी विचारला आहे. या घटनेची माहिती आगारप्रमुखाला माहिती नाही म्हटल्यावर काय म्हणायचे? आगारप्रमुख आणि या ठिकाणी असलेल्या सुरक्षा रक्षकांवर कारवाई झाली पाहिजे. नाहीतर आम्ही कायदा हातात घेऊ असा इशारा वसंत मोरे यांनी दिला.

**बसमध्येच साड्या, कंडोम्स सापडले**

पुण्यातील स्वारगेट बस स्थानकाच्या परिसरात पार्क केलेल्या आणि जुन्या बसेस मध्ये साडी, शर्ट, बेडशीट आणि कंडोम्स साडपले आहेत. त्यावरून रात्रीच्या वेळी या बसमध्ये काय प्रकार घडत असतील याचा अंदाज येतो. त्यामुळे महिला प्रवाशांसाठी बसस्थानक सुरक्षित नसल्याचं स्पष्ट होत आहे.

**स्वारगेटमधील बसमध्येच बलात्कार**

सगळ्या राज्याला हादरवून टाकणारी धक्कादायक घटना पुण्यात घडली असून स्वारगेट बस स्थानकात मंगळवारी पहाटे एका तरुणीवर बलात्कार करण्यात आला. एसटी स्टँड परिसरात पार्क केलेल्या एसटी बसमध्ये ही धक्कादायक घटना घडली. सीसीटीव्हीवरून या गुन्ह्यातल्या आरोपीची ओळख पटली असून त्याचं नाव दत्तात्रय गाडे असं आहे. दत्तात्रय गाडे सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर याआधीही अनेक गुन्हे दाखल आहेत.

## सर्व २३ सुरक्षा

तसेच या बसस्थांनकावर कार्यरत असलेले सर्व सुरक्षा रक्षक यांना तात्काळ बदलण्यात यावे, तसेच त्यांच्या ऐवजी दुसऱ्या सुरक्षा रक्षकांना नेमण्याची मागणी संबंधित सुरक्षा मंडळाला करावी. असे निर्देश दिले आहेत. याबरोबरच या प्रकरणाचा सविस्तर अहवाल पुढील ७ दिवसात आपणास सादर करावा अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी ) श्री. विवेक भिमानवार यांना दिल्या आहेत.

सध्या महिला सन्मान योजने अंतर्गत महिलांना त्यांच्या प्रवास तिकिटामध्ये ५० टक्के सवलत दिली जाते. त्यामुळे महिलांची प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याबरोबरच त्यांची सुरक्षितता हा देखील मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. स्वारगेट बसस्थानक वरील घडलेल्या घटनेच्या पार्श्र्वभूमीवर परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी उद्या महिला प्रवाशांच्या सुरक्षितते संदर्भात एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक बोलावली आहे. यामध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षितते संदर्भात ठोस निर्णय होणे अपेक्षित आहे.

पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात २६ वर्षीय तरुणीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली होती. त्यानंतर राज्य सरकारने मोठा निर्णय घेतलाय. स्वारगेट डेपोमधील २३ सुरक्षा रक्षक यांचे तात्काळ निलंबन करण्यात आलंय. उद्यापासून नवीन सुरक्षा रक्षक कामावर रुजू करण्याचे आदेश परिवहन मंत्र्यांकडून देण्यात आले आहेत. तर स्वारगेट डेपो मॅनेजर आणि वाहतूक नियंत्रक यांचे चौकशी करून एका आठवड्यात चौकशी अहवाल सादर केला जाणार आहे. परिवहन आयुक्तांकडे हा अहवाल सादर केल्यानंतर कारवाईचा निर्णय होणार असल्याची माहिती आहे.

## मार्च महिन्यात 'इतके' दिवस

तिरुअनंतपुरममधील अट्टुकल भगवती मंदिरात १० दिवसांचा उत्सव असतो. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, झारखंड आणि केरळमध्ये बँका बंद राहतील.

१४ मार्च – यादिवशी देशभरात मोठ्या उत्साहात रंगपंचमी सण साजरा केला जातो. यावेळी गुजरात, मिझोराम, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, सिक्कीम, आसाम, आंध्र प्रदेश, तेलंगणा, अरुणाचल प्रदेश, राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, दिल्ली, गोवा, बिहार, मेघालय आणि हिमाचल प्रदेशमध्ये बँका बंद राहतील.

१५ मार्च – होळीयाओसांग (दुसरा दिवस) होळी सणाच्या अनुषंगाने, त्रिपुरा, ओडिशा, मणिपूर आणि बिहारमध्ये बँका बंद राहतील.

१६ मार्च – यादिवशी रविवार असल्यामुळे देशातील बँका बंद असणार आहेत.

२२ मार्च – हा दिवस 'बिहार दिन' हा राज्याचा स्थापना दिवस आहे आणि २२ मार्च रोजी साजरा केला जातो. त्या दिवशी बिहारमध्ये बँका बंद राहतील. तसेच यादिवशी चौथा शनिवार असल्याने देशातील सर्व बँकांना सुट्टी असणार आहे.

२७ मार्च – हा दिवस शब-ए-कद्र ही ती रात्र आहे जेव्हा मुस्लिमांचा असा विश्वास आहे की कुराण पहिल्यांदा पैगंबर मुहम्मद यांच्यावर अवतरित झाले होते. जम्मू आणि काश्मीरमध्ये बँका बंद राहतील.

२८ मार्च – जुमात-उल-विदा हा रमजान महिन्यातील ईद-उल-फित्रपूर्वीचा शेवटचा शुक्रवार आहे. या निमित्ताने जम्मू आणि काश्मीरमध्ये बँकांना सुट्टी असेल.

३० मार्च – यादिवशी रविवार असल्याने देशातील सर्व बँका बंद असणार आहेत.

३१ मार्च – यादिवशी रमजान-ईद (ईद-उल फितर) असल्याने देशातील बँका बंद असणार आहेत.

## संतोष देशमुख हत्याप्रकरणात

कारवाई करण्यात आली आहे. वाल्मिक कराड हा राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा कार्यकर्ता असल्याने वादंग निर्माण झाला होता. या प्रकरणात देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी नेमून तपासाचे आदेश दिले होते. मात्र, संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाचा तपास निष्पक्ष होण्यासाठी धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी होत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### भिवंडीत कालिका माता मंदिरात महाशिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी शहरात महाशिवरात्री उत्सव संपन्न झाला असून, शहरातील कालिका माता मंदिर कासारळी येथे ब्रह्मकुमारी द्वारा दरवर्षी वेगवेगळे उपक्रम राबवले जात असतात. यावेळी आईस्क्रीमच्या ७५० लाकडी चमच्यांच्या सहाय्याने दोन फुटाची हुबेहूब शिवलिंग स्थापन करण्यात आली होती. कालिका माता मंदिरात महाशिवरात्री दिनानिमित्त सकाळपासून अनेक भागातून भाविकांनी अलोट गर्दी केली होती. शहरातील भक्तभाविकांनी कालिका माता मंदिर मध्ये शिवलिंगावर बेलपत्र वाहत दर्शन घेतले असून, भाविकांनी मोठी गर्दी मंदिरामध्ये होती.

### २६ वर्षीय महिलेवर अत्याचार प्रकरण ; शिवसेना उद्धव बाळासाहेब गट आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात एका २६ वर्षीय तरुणीवर बसमध्येच अत्याचार करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेनंतर आक्रमक झालेल्या शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते वसंत मोरे यांनी स्वारगेट डेपोमधील सुरक्षा रक्षकांच्या केबीनची तोडफोड केली. यानंतर शिवसैनिकांनी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केलं. यावेळी स्वारगेट बस डेपोत शिवसेना महिला आघाडीच्या वतीनं जोरदार आंदोलन करण्यात आलं. आम्हाला पंधराशे रुपये नको पण, सुरक्षा द्या असं म्हणत या महिलांनी जोरदार आंदोलन करत राज्याचे मुख्यमंत्रीही असणारे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली. यावेळी शिवसेना नेते वसंत मोरे म्हणाले स्वारगेट डेपोमध्ये जिथं सुरक्षा रक्षकांची केबीन आहे. त्याच्या समोरच ही बस उभी होती. त्यामध्ये महिलेवर अत्याचाराची घटना घडली आहे.स्वारगेट आगारात २० सुरक्षा रक्षक असताना एका महिलेवर अन्याय झाला. ही निषेधार्य बाब आहे. म्हणून आम्ही तीव्र आंदोलन केलं.

### स्वारगेट बस स्थानकात तरुणीवर झालेल्या अत्याचार प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्याच्या स्वारगेट बस स्थानकावर काल सकाळी एका तरुणीवर बसमध्ये अत्याचार झाल्याची घटना घडली. या अनुषंगाने मी स्वतः पोलीस आयुक्त तसेच तपास अधिकारी या सगळ्यांशी बोलले आहे. सीसीटीव्ही फुटेजही मी स्वतः पाहिले आहे. ही तरुणी आरोपी सोबत काही वेळ बोलत होती आणि त्याने तिची दिशाभूल करून, तिला खोटं सांगून बस मध्ये नेलं आणि अत्याचार केला. ती मुलगी काही वेळ त्याच्याशी बोलताना सीसीटीव्हीत दिसत आहे तर अनोळखी व्यक्तींशी बोलताना काळजी घेणे खूप गरजेचे आहे. शासकीय यंत्रणा, चौकशी कक्ष हे मदतीला असतातच तर त्यांच्याशी संवाद साधायला हवा होता. मात्र, दुर्दैवाने या मुलीने अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवला आणि पुढे हा गंभीर आणि वेदनादायी प्रसंग घडला. पोलिसांनी ८ तपास पथक तयार केली आहेत, आठ तपास पथक या सगळ्याचा कालपासून तपास करत आहेत. आरोपीला लवकरच अटक होईल. मात्र, माझं आवाहन आहे की तरुण मुलींनी, महिलांनी सार्वजनिक जीवनात वावरताना अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. यंत्रणांची मदत घ्यावी, स्वतःची काळजी घ्यावी. माणसांच्या कळपात हिंस्त्र श्वापदे वावरतात, त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, आपण सतर्क रहावे. आता या प्रकरणात या पीडित मुलीच समुपदेशन व तसेच जलद तपासासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत.

# पोलिसांचा धाक समाजात राहिलेला नाही : जयंत पाटील यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** अत्याचार घटना दिवसेंदवस वाढत आहेत, यावर पोलिसांचा दाब राहिलेला नाही. ताबडतोब सरकारने व्यवस्था केली पाहिजे, असं मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी व्यक्त करत विरोधकांवर टीका केली.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, बलात्कार करून महिलांवर खून होणे, मारून टाकणे आदी घटना दिवसेंदिवस वाढतच आहेत. कायदा सुव्यवस्थेचा फार मोठा प्रश्र्नचिन्ह उपस्थित होत आहे. पोलिसांचा धाक समाजात राहिलेला नाही. बस डेपोत असे प्रकार घडणं फार गंभीर आहे. सरकारने याची दखल घेऊन उपाययोजना केली पाहिजे. तुम्हीच कोणा कोणाला कुठे कुठे पाठवत आहे. कोण कशाला जाईल, हे माजी आमदार आहेत त्यांची काही कामे असतील – हे तीनही नावे पक्षाच्या वतीने निवडणूक लढवलेले आहेत ते पराभूत झाले. महत्वाची बातमी कील्ड करायची असेल तर, असे प्रकार वारंवार घडतात. असा माझा अनुभव आहे. तुम्हाला आश्र्चर्य वाटल अशी लाचखोरी सगळीकडे सर्रास चालू आहे. अधिकारी लाच मागत असतील. उद्योग आणण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे. त्यांना असं वाटतं, शेजारचे राज्य गुजरात राज्यात जावं, कर्नाटकात जावं, गुंतवणूकदारांना सपोर्ट मिळतो.महाराष्ट्रात आलेल्या गुंतवणूकदारांची तक्रार असते सपोर्ट मिळत नाही, कुठल्याही एमआयडीसीत नवी गुंतवणूक करणाऱ्याला रेड कार्पेट घालून त्याचा स्वागत फक्त महाराष्ट्रातले प्रमुख लोक भाषणात सांगतात. नाशिकचे पालकमंत्री येतच नाहीत. आमच्या पक्षाचे काही कार्यकर्त्यांनी मला सकाळी सांगितले सरकारचे रायगड आणि नाशिक या दोन्ही ठिकाणी दुर्लक्ष झाले आहे. पालकमंत्री तुमच्या जिल्ह्यांना देण्यासाठी सरकारने तत्परता दाखवली नाही. २६ जानेवारीला पालकमंत्री येतात. आता १५ ऑगस्टपर्यंत तरी, किमान पालकमंत्र्यांची नेमणूक होईल, अशी अपेक्षा करू. माणिकराव कोकाटे यांच्याबाबत कोर्टाने निर्णय दिलेला आहे. अलीकडच्या काळात कोणाचा गुन्हा मान्य करायचा नाही असं सरकार चालवताना मला अनेकांची भूमिका दिसते. कोर्टाने निर्णय दिला त्यामुळे पुढे बघू काय होतं. केस मला फारशी माहित नव्हती माणिकराव मंत्री झाल्यावरच केस वरती येणे. त्यांना आता मंत्रिपद सोडायच्या जवळ आणणे बऱ्याच मंत्र्यांचे बरेचसे प्रश्र्न आहेत. काहींचे प्रश्र्न पाईपलाईन मध्ये आहेत. सरकारने फारसे गांभीर्याने त्याकडे घेतला नाही. मिटकरींनी भाष्य केले आहे की एका ओएसडी दिने आमदाराकडे अमोल मिटकरी यांच्याकडे पैसे मागितले. अधिकाऱ्यांचे धाडस किती पुढे गेले आहे. आमदारांकडे पैसे मागतात. याचा अर्थ आमदार काम करणारा त्याने आमदाराला यातून पैसे मिळणार आहेत. त्यांची माहिती खरी असेल. टीका राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यावेळी बोलताना केली.



## बिबट्याची हत्या करणारे ३ आरोपी निष्पन्न; आरोपींच्या शोधासाठी वन विभागाची २ पथक रवाना





दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यात झालेल्या बिबट्याच्या हत्येप्रकरणी ३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. काल अंबड तालुक्यातील भालगाव रोडवरील पुलाखाली मृतावस्थेत एक बिबट्या आढळून आला होता. अंबड – भालगाव येथील ग्रामस्थांनी बिबट्या मृतावस्थेत आढळल्याची माहिती वन विभागाला दिली होती. त्या माहितीवरून वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला होता. त्यानंतर आता याप्रकरणी ३ जणांवर वन्यजीव कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून बिबट्याची हत्या करणारे ३ आरोपी निष्पन्न झालेत. दरम्यान, आरोपींच्या शोधासाठी वन विभागाचे २ पथकाने रवाना करण्यात आल्याची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी विजयकुमार दौंड यांनी दिलीय. जालन्यातील अंबड परिसरात अंबड ते भालगाव या रस्त्याच्या शंकर राजाराम भोजने यांच्या शेताजवळ सडलेल्या अवस्थेत आढळलेला बिबट्या व्हायरल व्हिडिओतला असल्याची कबुली वनविभागाने दिलीय. दोन दिवसापूर्वी जालन्यातील घनसावंगी कुंभारपिंपळगाव परिसरात अज्ञात लोकांनी बिबट्याला मारहांन केल्याचा प्रकार समोरं आला होता. त्या मारहानीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्या व्हायरलं व्हिडिओ मधला हा बिबट्या असल्याची माहिती वनविभागाने दिलीय. या प्रकरणी वन्यजिव संरक्षण अधिनियम १९७२ अन्वये शिकार करणे, प्राण्याची तस्करी करणे, अवेध वाहतूक करणे या कलमानव्ये आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय त्याची माहिती विजयकुमार दौंड, वन परिक्षेत्र अधिकारी, जालना यांनी दिलीय

## नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्या संदर्भात आजची आढावा बैठक पार पडली; गिरीश महाजन यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कुंभमेळ्या बाबत आज सविस्तर चर्चा झालीय. पाच ते सात अधिकाऱ्यांची टीम कुंभ मेळ्याची पाहणी करण्यासाठी गेली होती. तिथे कसे नियोजन केले गेले याचा अभ्यास आम्ही केला.आजच्या बैठकीत चर्चा झाली. पुढे नाशिकमध्ये काय सुविधा करता येतील याबाबत आज चर्चा झाली. अशी माहिती जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



एवढी माहिती देताना गिरीश महाजन म्हणाले की नाशिक येथे पुढील तीन वर्षांनंतर कुंभमेळा होणार आहे. कोणत्याही प्रकारची निधीची कमतरता पडणार नाही, अजून किती खर्च करणार याचा आकडा नाही ठरवला आहे. वेगवेगळ्या विभागामार्फत काम होईल, रेल्वेचे प्लॅट फॉर्म वाढवणार आहोत. गोदानदी स्वच्छ केली जाईल. जे- जे आवश्यक आहे.ते केले जाईल. मागच्या वेळी जेवढा कुंभ सुंदर झाला तसा आम्ही करणार आहोत. पालकमंत्री म्हणून योग्य निर्णय होईल, आज दोन्ही उपमुख्यमंत्री यांचा पूर्व नियोजित कार्यक्रम होता. ही बैठक दोन दिवसापूर्वी ठरली होती. आमच्या महायुतीत अनेक जण येत आहेत. त्यांना आम्ही घेत आहोत. पुणे येथे घडलेली घटना ही अतिशय दुर्दैवी आहे. हा आरोपी अनेक गुन्हामध्ये अडकला आहे. मुख्यमंत्री माझ्या समोर सीपी सोबत बोलले आहेत. आरोपीला शिक्षा होईल.अतिशय गतीने काम चालावे ही सरकारची भूमिका आहे. वरिष्ठ पातळीवर चौकशी सुरु आहे. त्या कुटूंबाने आंदोलन मागे घ्यावे, निकम यांचा मुलगा मुंडे यांची कोणती केस लढत आहेत हे माहिती नाही. कोरटकर यांना कुणीही वाचवत नाही त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. असे मत जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## प्रशांत कोरटकर यांच्या विरोधात संभाजी ब्रिगेड आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** महापुरुषांचा अपमान करणार्या प्रशांत कोरटकरला ठोकून काढू असा इशारा संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिन सावंत देसाई यांनी पत्रकार परिषदेत दिला. देसाई यावेळी म्हणाले की, इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकीचा फोन आल्याची माहिती समोर आल्यानंतर संभाजी ब्रिगेड हे आक्रमक झाले आहे. यापुढे खोटा इतिहास खपवून घेतला जाणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेऊन प्रशांत कोरटकर नावाचा एक 'परशूरामी ब्राम्हण' धमक्या देत असल्याचं इंद्रजीत सावंत यांनी फेसबुक पोस्टमध्ये म्हटलं आहे. त्यानंतर आता प्रशांत कोरटकर यांच्या विरोधात संभाजी ब्रिगेड आक्रमक झाले आहेत. प्रशांत कोरटकर जिथे भेटेल तिथे ठोकून काढू, बहुचर्चित 'छावा' चित्रपटाबद्दल माध्यमांशी बोलताना इंद्रजित सावंत यांनी ब्राह्मण द्वेषी विचार मांडल्याचा आरोप होत आहे.



ब्राम्हणवादी लोकांनी छत्रपती संभाजीराजेंना पकडून दिल्याचे वक्तव्य इंद्रजीत सावंत यांनी केले होते.संभाजी ब्रिगेडने इंद्रजीत सावंत यांना पाठिंबा दिला असून प्रशांत कोरटकरला भेटेल तिथे ठोकून काढू असा, इशारा संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिन सावंत देसाई यांनी दिला आहे.

# जेजुरी गडावर महाशिवरात्र निमित्त त्रैलोक्य दर्शन घेण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी:** महाशिवरात्र निमित्त अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत आणि बहुजन समाजाचे लोकदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरीगडाच्या मंदिरात आणि शिखरावर असणाऱ्या स्वर्गलोकी,भूलोकी,व पाताळलोकी ( त्रैलोक्य ) या शिवलिंगाच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी गर्दी केली होती.

आज पहाटे पासून रांगा लावून हजारो भाविकांनी देवदर्शन घेतले. जेजुरीगडावर येळकोट येळकोट जयमल्हार, सदानंदाचा येळकोटचा, हर हर महादेवाचा जयघोषाने वातावरण मल्हारमय झाले







जेजुरीला दक्षिणेकडील काशी मानले जाते. कैलास पर्वता नंतर जेजुरी गडावर शंकर व पार्वतीचे एकत्रित स्वयंभू शिवलिंग पाहण्यास मिळते...

म्हणून महाशिवरात्री यात्रेला येथे वेगळे धार्मिक महत्व आहे . जेजुरी गडाच्या मुख्य मंदिरावरील शिखरात असणारे शिवलिंग हे स्वर्गलोकी शिवलिंग मानले जाते. तर गडावरील मुख्य मंदिरातील स्वयंभू लिंग हे भूलोकी शिवलिंग आणि गाभाऱ्यातील मुख्य मंदिरा शेजारी असणाऱ्या गुप्त मंदिरातील तळ घरात असणारे शिवलिंग पातालोकी शिवलिंग मानले जाते.

मुख्य मंदिरातील स्वयंभू शिवलिंग हे दर्शनासाठी रोज खुले असते तर मंदिराच्या शिखरावरील व मुख्य मंदिरातील तळ घरातील शिवलिंग हे केवळ वर्षातून एकदा महाशिवरात्री दिवशी दर्शनासाठी उघडले जाते. महाशिवरात्रीला जेजुरी गडावर त्रैलोक्य शिवलिंग दर्शनाची मोठी पर्वणी असल्याने हजारो भाविक हा लाभ घेण्यासाठी मोठी गर्दी करीत असतात.

विविध वृत्त...

## श्रीक्षेत्र मुंडेश्वर संस्थान येथे महा अभिषेक



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** श्रीक्षेत्र मुंडेश्वर संस्थान केशव शिवनी येथे महाशिवरात्रीच्या मुख्य पर्वावर महा अभिषेक करण्यात आला दही, दूध, मद, साखर, तुप, व गंगेच्या पाण्याने शंकर भोलेनाथाचा महाभिषेक करण्यात आला सोडोपचारे देवाला नैवेद्य अर्पण आला व महाआरती करुन महाभिषेकाची सांगता झाली महाअभिषेक काचे यजमान वसंतराव नारायणराव उदावंत, ज्ञानेश्र्वर सुरेश कुलथे, हरिभक्त परायण प्रेमानंद महाराज देशमुख माऊली, वारकरी शिक्षण संस्था पांगरी फाटा,मुख्य गाभाऱ्यात भाविक भक्त दिनकर मुंढे, सतीश वाघ, सुभाष गावडे, राजु मुंढे, परमेश्र्वर डोंगरे, रामेश्र्वर खारडे, ज्ञानेश्र्वर गावडे, सतीश शेरे, विनोद चव्हाण , बद्री आंधळे, विलास घुगे ,बबनराव उदावंत, विठ्ठल गीते, दानवे साहेब व अभिषेकासाठी पंडित श्री शिवहरी देशपांडे यांच्या मंत्रघोषांनी महाअभिषेक करण्यात आला महाअभिषेक साठी सौ रुक्मीनाबाई कुलथे, पुष्पाबाई शेरे ,गंगुबाई शेरे, बालाबाई आंधळे, सुशीलाबाई शेरे ,कमलबाई शेरे, लताबाई शेरे, चंद्रकोर बाई डोंगरे ,सिंधुबाई घुगे, डॉक्टर शेरे ताई, पुष्पाबाई शेरे, कमलबाई भास्कर शेरे, किरण बाई गावडे, कणखरबाई आदिकरून गावातील अनेक भाविक भक्त व सेवेकरी भक्त हजर होते

## २२ दिवसांच्या बाळाला श्वास घेण्यास त्रास होत असल्याने बाळाला दिले गरम विळ्याचे चटके

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** चिखलदरा तालुक्यातील सिमोरी गावातील २२ दिवसाच्या बाळाला गावातील भोंदूबाबा (भूमका) ने गरम विळा तापवून ६५ वेळा चटके दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा अतिदुर्ग मेळघाटा अंधश्रद्धेचा कळस पाहायला मिळत आहे.

या प्रकारामुळे २२ दिवसीय बाळाची प्रकृती बिघडल्याने त्याला नातेवाईकांनी सिमोरी गावावरून हातरू प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नेण्यात आले होते. मात्र, बाळाची गंभीर प्रकृती पाहता येथून या बाळाला अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात रेफर केले आहे. सध्या या बाळावर अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात उपचार सुरू आहे. बाळाला श्वास घ्यायला त्रास होत होता म्हणून बाळाच्या नातेवाईकाने भोंदू बाबाकडे नेऊन बाळाला गरम चटके दिले, बाळाच्या हृदयाला श्वास घ्यायला त्रास होतो, त्याची प्रकृती चिंताजनक आहे अशी माहिती डॉक्टरांनी दिली. दरम्यान, या घटनेने मेळघाटातील आदिवासींचा अजूनही आरोग्य यंत्रणेवर विश्वास नसल्याचं स्पष्ट होत असून, मेळघाटातील आदिवासी अजूनही अंधश्रद्धेच्या आहारी जात असल्याचे दिसून येत आहे.

## केवळ भेटीमुळे प्रवेशाची चर्चा होणे अयोग्य; सुनील तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि राज्याचे म हसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या भेटीबाबत ते



दोघेच जास्त माहिती देऊ शकतील. राजकीय निर्णय घ्यायचा अधिकार त्यांचा आहे, तशी चर्चा नसताना विनाकारण त्या व्यक्तीची बदनामी होत असते. जयंत पाटील मुरब्बी राजकारणी आहेत, केवळ भेटीमुळे तशी चर्चा होणे योग्य नाही, असे मत जयंत पाटील आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या भेटीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरेंनी व्यक्त केलंय. ते मुंबईत पक्षाच्या कार्यालयात बोलत होते.

## धुळ्यात महाशिवरात्रीचा उत्सव उत्साहात साजरा





महाशिवरात्री निमित्ताने धुळ्यामध्ये मंदिरांमध्ये गर्दी झाल्याचं पहायला मिळालं शहरातील अति प्राचीन असलेलं जमनागिरी येथील महादेव मंदिरात भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली होती. यावेळी मंदिर ट्रस्ट तर्फे भाविकांची योग्य ती सोय तसेच महाप्रसादाचे देखील वितरण करण्यात आले. यासह धुळे शहरातील माजी आमदार अनिल गोटे यांनी बांधलेल्या पांझरा नदीवरील पांझरेश्वर महादेव मूर्तीला देखील सकाळपासून भाविकांनी मोठी गर्दी केली होती. आकर्षक अशी विद्युत रोषणाईसह मूर्तीला सजवण्यात आले असून भाविकांनी या भागात दर्शनासाठी मोठ्या रांग लावल्या होत्या तसेच मॉर्निंग ग्रुप तर्फे महाप्रसादाचे देखील वितरण करण्यात आले.

# आयुर्वेद, आधुनिक वैदिक पद्धती यांच्यातील दरी कमी होणार

## केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आयुष मंत्रालयाच्या वतीने देशभर राबविण्यात आलेल्या देश का प्रकृती परीक्षण अभियानाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाले असून या अभियानांतर्गत पाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड ही आयुष मंत्रालयाच्या नावे नोंद झाले आहेत अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा येथे पत्रकार परिषदेत दिली.



केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्यावतीने २६ नोव्हेंबर संविधान दिनापासून ते २५ डिसेंबर २०२४ माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंतीचे औचित्य साधून संपूर्ण देशामध्ये देश का प्रकृती अभियान आयुष मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात आलं एका महिन्याच्या कालावधी देशातील एक कोटी २९ लाखाहून अधिक नागरिकांच्या प्रकृतीचे यशस्वीरित्या परीक्षण करण्यात आलं या परीक्षणाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाल्याची माहिती केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले याशिवाय या अभियानात नवीन पाच विश्व रेकॉर्ड प्रस्थापित झाले आहेत अशी माहिती ही केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी दिले या अभियानाची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रीय आयुर्वेददिनाच्या निमित्ताने करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

देश का प्रकृती परीक्षण अभियानाला पाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मिळाले आहेत ते आरोग्य सेवेबद्दल राष्ट्राच्या वचनेबद्धतेत आणि आयुर्वेदाला मिळत असलेल्या जागतिक मान्यतेचे प्रतीक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितलं येणाऱ्या काळामध्ये जिल्हा आणि तालुका स्तरावरही आयुर्वेदिक औषधालय क द्र सरकारच्यावतीने सुरु करण्यात येणार असल्याची माहिती आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी दिली देश का प्रकृती परिषद अभियानात १,८१६६७ स्वयंसेवकांनी योगदान दिले त्यांचेही आभार केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी माणले.

देश का प्रकृतिक अभियानात भारताच्या विविधतेतील एकतेचे रूप दिसून आल्याचे त्यांनी सांगितलं वैयक्तिक आरोग्य व्यवस्थापनात भारताच्या नेतृत्वाची पुनर्पृष्ठी केली आणि आयुर्वेदाच्या निवारक आरोग्यसेवा व जीवनशैली व्यवस्थापनातील महत्त्वाची भूमिका या अभियानामुळे अधोरेखित झाली आहे हा डेटा आधारीत दृष्टिकोन साध्य आधारित संशोधनासाठी महत्त्वपूर्ण ठरेल ज्यामुळे आयुर्वेद आणि आधुनिक वैदिक पद्धती यांच्यातील दरी कमी होऊन भारताच्या आरोग्य क्षेत्राच्या प्रगतीला नवे बळ उत्पन्न करून देईल असा आशावादी केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केला.

## गिरगावातल्या शाळेत होणार 'अभिजात मराठी' ची गर्जना!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**२७ फेब्रुवारी हा दिवस साहित्यिक कुसुमाग्रज म्हणजे 'विष्णू वामन शिरवाडकर' ह्यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. ह्या दिवशी शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये तसेच अन्य ठिकाणी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा सुद्धा देण्यात आला आहे. ह्याचेच अवचित्त साधून अश्याच एक कार्यक्रमाचे आयोजन गिरगाव मधल्या नामांकित चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलमध्ये करण्यात आले आहे.

२७ फेब्रुवारी रोजी सकाळी '०७ वाजून १ मिनिटे' ते सायंकाळी '०६ वाजून ०४ मिनिटपर्यंत सलग १ हजाराहून अधिक गाण्यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. ह्या कार्यक्रमात शिशुवर्गापासून ते दहावी पर्यंतचे विद्यार्थी तसेच शिक्षक वर शिक्षकेतर सहकारी असे एकूण १ हजार १२ जण ह्या कार्यक्रमात गाणं सादर करणार आहेत. भावगीते, भक्ती गीते, लोकगीतांचा समावेश ह्या कार्यक्रमात करण्यात येणार आहे.

## मेहकर ते जालना मेन रोड पिंपळगाव लेंडी फाट्यावरती आग्या मोहोळचा थैमान

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** महाशिवरात्रि दिनानिमित्त श्री क्षेत्र निर्मळेश्वर संस्थान पिंपळगाव लेंडी येथे महाशिवरात्री भव्य यात्रा उत्सव निमित्त येणार्या १००ते १२५ भावीक भक्तांना खुप मोठ्या प्रमाणात आग्या मोहळ डसलेले आहे यामध्ये एक प्रल्हाद रंदवे, (७०) पत्नी शुशला (६५) रंदवे या दोघा जख्मी यांना अमोल पवार यांच्या स्विफ्ट गाडी मध्ये ग्रामिन रूग्णालयात भरती केले तसेच तहसील कार्यालयामधील बाबू इंगोले यांना १०८ मध्ये रोडवरील जाणारे येणारे प्रवासी यांना खूप मोठ्या प्रमाणात आग्या मोहळ चावलेले असल्याने १०८ वर मदत २:३८ ला मागितले असता १०८ ची मदत ३:०८ मि अर्धा घंटा नंतर मिळाली फक्त नऊ किलोमीटर अंतरावर असलेलं लोकेशन साठी म्बुलन्सला येण्यासाठी अर्धा तास लागला सरकारी कोणतेच धुर यंत्र फवारणी साठी उपलब्ध नसताना त्यानंतर गजु गायके, अविनाश गायके यांच्या सहकारी मित्रांनी टिप्पर मध्ये धुर करुन रोड वरती फेऱ्या मारल्या त्यानंतर थोड्या प्रमाणात शातंता पाह्यला मिळाली मदत कार्य म्हणून ज्ञानेश्वर तिकटे, बंडू गायके,सुभाष गायके,शिवाजी लबडे, गजू गायके, नंदू तिकटे यादींनी कचर्याच्या साह्याने धुर करुन अंगावरील मद्ममाश्या पळविण्यासाठी अनमोल सहकार्य करण्यात आले काही जखमींना जालना येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.





# महाशिवरात्रीनिमित्त सव्वा क्विंटल फराळाचे वाटप

## विविध मान्यवरांच्या उपस्थितीत फराळ वाटपाला प्रारंभ

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी राजेश वाघमारे व चित्रगंधा मित्र मंडळाच्या वतीने महाशिवरात्री निमित्त ओलांडेश्वर महादेव संस्थान डोणगाव येथे १२५ किलो नायलॉन साबुदाणा फराळाचे वाटप विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ओलांडेश्वर महादेव संस्थान येथे सकाळपासूनच दर्शनासाठी आलेल्या हजारो शिवभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

डोणगाव येथील ओलांडेश्वर महादेव संस्थाने परिसरातील प्रसिद्ध संस्था नाही. या ठिकाणी दर सोमवारी





शिवभक्त दर्शनासाठी येतात. आज महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांनी सकाळपासूनच ओलांडेश्वर महादेव संस्थान येथे दर्शनासाठी हजेरी लावून फराळाचा आस्वाद घेतला राजेश वाघमारे व चित्रगंधा मित्र परिवाराच्या वतीने गेल्या वीस वर्षांपूर्वी तीन किलो फराळाचे वाटप सुरूवात करून या कार्यक्रमात या फराळाच्या वाटपाला सुरुवात केली होती. वीस वर्षात तब्बल सव्वा क्विंटल नायलॉन साबुदाणा फराळाचे वाटप करण्यात येत आहे. तीन किलोपासून सुरू केलेले हे कार्य तब्बल सव्वा क्विंटलवर जाऊन पोहोचले आहे. महाशिवरात्रीनिमित्त २६ फेब्रुवारी रोजी आयोजित फराळ वाटपाचा कार्यक्रम डोणगाव पोलीस स्टेशन चे ठाणेदार अमरनाथ नागरे, मा.जि.प.सभापती राजेंद्र पळसकर, मा.प.सभापती निंबाजी पांडव, डॉ.ज्ञानेश्र्वर टाले, शेतकरी नेते. शंतनू आखाडे सर, सुनील पाटील आखाडे, पत्रकार सचिन गाभणे, संपादक देविदास पाटील खनपटे, .कुंजन भैय्या जयस्वाल यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. ओलांडेश्वर महादेव संस्थान येथे दर्शनासाठी आलेल्या हजारो शिवभक्तांनी या फळाचा लाभ घेतला, तसेच या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सकाळपासून संध्याकाळ पर्यंत भाविकांनी हजेरी लावून दर्शन घेतले.